महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तशिविकापु/पदविका प्रवेश २०२०-२१/२०२०/२२३४ दिनांक : ०७.०८.२०२०

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागातील पोस्ट एस.एस.सी. व पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाच्या
शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सुविधा केंद्र (FC) स्थापित केलेल्या संस्था.

विषय : पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ साठी स्थापित केलेल्या सुविधा केंद्रावर (Facilitation Centre) कोविड १९ च्या पार्श्वभूमीचर खबरदारी घेण्यासंदर्भात प्रमाणित कार्यपध्दती (SOP)

संदर्भ : १) शासन आदेश महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांचे आदेश क्रमांक डीएमयु/२०२०/सीआर९२/डीआयएसएम १ दिनांक २९.०७.२०२०.

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक ०६.०८.२०२० चे पत्रान्वये प्राप्त झालेली प्रमाणित कार्यपध्दती

उपरोक्त विषयान्वये, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान खबरदारी घेण्यासंदर्भात संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रमाणित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यासाठी आपणास खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. सर्व सुविधा केंद्रांनी सदर कार्यपध्दती, राज्य/केंद्र शासनाने कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे, विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / स्थानिक प्रशासन यांनी कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / यांचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या सर्व सूचनांचे अनुपालन करण्याची जबाबदारी संबंधित सुविधा केंद्र असलेल्या संस्था प्रमुखाची असेल.

२. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेत काम करणा-या सर्व अधिकरी / कर्मचारी यांनी मास्क लावणे आवश्यक आहे. संस्थाप्रमुखांनी संस्थेत काम करणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे वयासह यादी तयार ठेवावी.

३. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेत काम करणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी सॅनिटायझर / हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

४. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेत प्रवेशाचे कामासंदर्भात भेट देणा-या अर्जदार / पालक यांनी मास्क परिधान करणे आवश्यक आहे, अशा सूचना त्यांना प्रवेशद्वारावरच लावून याबाबतचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील.

५. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेच्या प्रवेशद्वारावरच स्पर्शविरहित थर्मोमीटर आणि ऑक्झिमीटर द्वारे अभ्यागतांची / विध्यार्थ्यांची तसेच संस्थेतील कार्यरत अधिका-यांची / कर्मचा-यांची तपासणी बंधनकारक असेल.

६. सुविधा केंद्रास प्रवेशाचे कामासंदर्भात भेट देणारे अभ्यागत / विद्यार्थी यांचे वापरासाठी निश्चित केलेले पॅसेज, प्रसाधनगृहे, लिफ्ट, चौकशी काऊंटर, संगणक व इतर सर्व संसाधने इत्यादींचे रोज साधरणतः दोन तासाचे अंतराने निर्जंतुकीकरण आवश्यक असेल.

७. सुविधा केंद्रारा भेट देणारे विद्यार्थी / पालक यांचे कडून सामाजिक अंतर राखण्याच्या नियमांचे पालन व्हावे या दृष्टीने रांगेचे व्यवस्थापन, पुरेसे अंतर (६ feet) ठेवून रांगेत उभे राहण्यासाठी वर्तुळ आखणी या तरतुदी संबंधित संस्थेने कराव्यात. तसेच रांगेचे व्यवस्थापन आणि नियंत्रणासाठी एका स्वतंत्र कर्मचा-याची नियुक्ती करण्यात यावी.

८. गर्दी टाळण्याच्या दृष्टीने विद्यार्थी / पालक यांचे साठी पुरेश्या प्रमाणात मार्गदर्शनासाठी दिशादर्शक (Sign बोर्ड/ पोस्टर्स) योग्य ठीकाणी लावावेत.

९. संबंधित ठिकाणच्या स्थानिक प्रशासन / जिल्हाधिकारी यांनी जर एखाद्या सुविधा केंद्राचा परिसर कंटेनमेंट क्षेत्र घोषित केला असेल तर तेथील सुविधा केंद्रविषयक कामकाज तात्काळ बंद करण्यात यावे. याबाबतची माहिती संबंधित संस्थाप्रमुख व नोडल अधिकारी यांनी या विभागीय कार्यालयास तात्काळ कळवून रांगेतील विद्यार्थ्यांची अर्ज भरण्यासंबधीची अपूर्ण राहिलेली कर्यवाही या विभागीय कार्यालयाचे सहसंचालक यांचे निर्देशानुसार संबंधित नोडल अधिकारी व संस्थाप्रमुख यांनी पूर्ण करावयाची आहे. यासाठी हे विभागीय कार्यालय सदर बाब संचालनालयास तात्काळ अवगत करुन सदर सुविधा केंद्राचे कामकाज (Slot Booking इत्यादी) इतर सुविधा केंद्रावर हस्तांतरित करणेबाबत संस्थाप्रमुखांना व नोडल अधिकारी यांना योग्य ते निर्देश देईल

१०. वरील प्रमाणे सुरक्षेच्या सर्व उपाययोजनांचे पालन सर्व सुविधा केंद्राकडून होते किंवा नाही याची नोडल अधिकारी व हे विभागीय कार्यालय खातरजमा करेल. जर एखाद्या सुविधा केंद्रावर वरील प्रमाणे सुरक्षेचे उपाय योजलेले नाहीत किंवा संबंधीत यंत्रणांनी निर्गमित केलेले निर्देश / मार्गदर्शक तत्वे यांचे अनुपालन होत नाही असे विभागीय कार्यालयाच्या अथवा त्यांचे प्रतिनिधींचे लक्षात आल्यास अशा सुविधा केंद्राविषयक कामकाज तात्काळ स्थगित करण्यात येईल व याबाबत संचालनालयाचे निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

११. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर कोणत्याही परिस्थितीत गर्दी होणार नाही यादृष्टीने सुविधा केंद्र हे साधन सामग्रीने व सुविधांनी सुसज्ज राहील तसेच तेथील अधिकारी / कर्मचारी वर्ग पुरेशा प्रमाणात राहील याची खातरजमा करण्याची जबाबदारी सुविधा केंद्र असलेल्या संस्था प्रमुखाची राहील.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता पदविका प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रासाठी जिल्हानिहाय नोडल अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक :

| अ.क्र. | जिल्हा | नोडल अधिकारी | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | श्री. पी. यु. वायसे | ९४२१२१९९१७ |
| २ | पुणे | डॉ. व्ही. एस. बांदल | ९४२१०१७४६२ |
| ३ | सांगली | डॉ. एन. पी. सोनजे | ९८२२३१५७०५ |
| ४ | सातारा | डॉ. आर. के. पाटील | ९८२२८५०४७२ |
| ५ | सोलापूर | डॉ. एम. आर. चितलांगे | ९४२१६६२९२० |

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : सर्व जिल्हा नोडल अधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.